जा.क्र.जिपला/शिक्षण/कार्या- १३/सीआर- ०३/प्रि 267 /२०१9
शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद लातूर
दिनांक 18/3 /२०१9

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
**महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिरिंग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च,**
**पुणे**

**विषय :- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) १२.**
**२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१६/ प्रक्र. ६९/एसएम-२ दि. १७/०६/२०१६**
**३. मा. शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग लातूर यांचे पत्र जाक्र. / शिउला/ प्रावि-२/पीपीडी/२०१६-१७/१३७३७/१४०१८ दि. २६/०७/२०१६.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरीता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकारीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा / दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ०१ | लातूर | महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिरिंग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च पुणे | डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल लातूर स.न. ३५ पोस्ट आर्वी ता.जि. लातूर | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक १ ते ८ | २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबंधीत शाळांच्या व्यवस्थापनांनी अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालील प्रमाणे परवानगी (इरादापत्र) देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी या कार्यालयास प्रस्ताव सादर करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करीता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबीं उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करुन शासन निर्णयाच्या दिनांकापासून आठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जुन २०१२ मध्ये विहीत केलेल्या सर्वकष धोरणानुसार नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता सदर शासन निर्णयातील परिच्छेद १० नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्रा) / जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधिस मंडळाच्या संलग्नता ना हरकत प्रमाणपत्र देईल.

३. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना

४. शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन ) अधिनियम २०१२ (सन २०१२ चा ०१) मधील सर्व तरतुदिचे पालन करणे बंधनकारक राहील.

५. शिक्षणाधिकारी यांची अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री झाल्यानंतरच शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठि काण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी / माध्यमासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा/माध्यम व्यतिरिक्त शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

७. या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा/दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय युडायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवगा्रत नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधीत संस्थेवर राहील, याकरीता राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

८. संस्थेने सर्व संबंधीतांच्या माहितीकरीता स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहिर फलक शाळेच्या बाहेरील प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, लातूर**

प्रतिलिपी व माहीतीस्तव सविनय सादर :-

१. मा. सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय म.रा. पुणे-०१
३. मा. शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग लातूर.
४. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, लातूर
५. याची एक प्रत मुख्याध्यापक, डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल लातूर स.न. ३५ पोस्ट आर्वी ता.जि. लातूर

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, लातूर